# सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
## नविन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६१२ २८४६/४७, २६१२ ७२१७ फॅक्स क्र.०२०- २६१३ ३०८२, २६१२ ७००४.

Email :- comm_audit@rediffmail.com


---

जा.क्र.सआ/अनिलेप/ कक्ष-१८/कलम ८१,७९/परिपत्रक/ 7026 /२०१४

दिनांक २५ नोव्हेंबर २०१४.

## परिपत्रक

**विषय :- महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा १९६० सुधारित कलम ८१ व कलम ७९ अंतर्गत कार्यवाही.**

संदर्भ :- १) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग पत्र क्र. सीएसएल २०९३/प्र.क्र.८२६/१५ स, दि. १६/१२/२०१३

२) या कार्यालयाचे जा.क्र. स.आ/लेप/परिपत्रक/कक्ष-१८/४४४, दि. ३० एप्रिल २०१४

३) या कार्यालयाचे जा.क्र. स.आ/अनिलेप/नामतालिका/आदेश/कक्ष-१८/९७६, दि. २८/१० २०१४

४) या कार्यालयाचे दि. १७/११/२०१४ रोजीचे सभेतील सुचना

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (१A) नुसार प्रत्येक सहकारी संस्थेने वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिन्याचे आत संबंधित निबंधक किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिका-याकडे एकुण ६ प्रकारची विवरणपत्रे दाखल करणे बंधनकारक केलेले आहे.

कलम ७९(१B) नुसार शासनमान्य नामतालिकेवरील लेखापरीक्षकांची नेमणुक व त्यांची लेखी संमती, लेखापरीक्षक नेमणुकीचे ठराव संस्थेने वार्षिक सर्वसाधारण सभा झाल्यानंतर १ महिन्याचे आत दाखल करणे बंधनकारक आहे. त्यानुसार संस्थेने कारवाई न केल्यास निबंधकाने दि. ३० नोव्हेंबर पर्यंत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ (१) (A) च्या पहिल्या परंतुका अंतर्गत संबंधित संस्थेचे लेखापरीक्षण करणेसाठी नामिकेवरील लेखापरीक्षकाची नियुक्ती करावी व सदरची नियुक्ती आदेश विभागाचे संकेतस्थळावर सादर (Upload) करावेत.

महाराष्ट्र राज्य सहकारी नियम १९६१ नियम ६९ (१) (B) अन्वये लेखापरीक्षण अहवालाचा भाग अ, आर्थिक पत्रके व लेखापरीक्षकांचे प्रमाणपत्र खात्याच्या संकेतस्थळावर सादर (Upload) करण्याची तरतुद केलेली आहे.

या कार्यालयाने आढावा अंती दि. २० नोव्हेंबर २०१४ पर्यंत सर्व विभागाकडुन प्राप्त माहीती आधारे एकुण संस्थांपैकी ५१०९६ संस्थांचे लेखापरीक्षण झाल्याचे अहवाल प्राप्त आहे. मात्र खात्याचे संकेतस्थळाचे आधारे कलम ७९ अंतर्गत खालील विवरणपत्र सादर (Upload) केलेली दिसून येतात.

| अ.क्र. | कायदा कलम | तपशिल | संख्या |
|---|---|---|---|
| १ | ७९ (१) (A) | **आर्थिक पत्रके** | |
| | | १) ताळेबंद | ३३४३० |
| | | २)नफातोटा पत्रक | ३३४३७ |
| २ | ७९ (१) (B) | वार्षिक नियोजन | २८०२५ |
| | | लेखापरीक्षक संमती | ३००१० |

कायद्याअंतर्गत तरतुदीचे पालन न केल्यास कलम १४६ व १४७ नुसार शिक्षेस पात्र ठरतील असे संबंधित निबंधकाने संस्थेला लेखी आदेशान्वये कळवावे.

कलम ८१ (१) (A) चे पहिल्या परंतुकानुसार सर्व संस्थोचे १) लेखापरीक्षक नेमणुक संस्था ठराव २) लेखापरीक्षक संमती व लेखापरीक्षण अहवाल (भाग अ / नफातोटा पत्रक, ताळेबंदपत्रक ) या तिन बाबींचे कटाक्षाने पालन करण्यास्तव दि. ३० नोव्हेंबर २०१४ पर्यंत सदर कायदेशीर तरतुदीचे पालन करणे आवश्यक आहे.

वर उल्लेखित कार्यवाहीच्या अनुषंगाने सर्व जिल्याच्या निबंधक / जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी तातडीने सर्व लेखापरीक्षकांची सभा घेवून पुर्तता करुन घ्यावी. सदर परिपत्रकाचे काटेकोर पालन न केल्यास कार्यवाही केली जाईल याची गंभीर दखल घ्यावी.

**(दिनेश ओऊळकर)**
**सहकार आयुक्त व निबंधक**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रति,**

विभागीय सहनिबंधक, (प्रशासन/लेखापरीक्षण) सर्व,
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सर्व,
जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग- 1 /2 सर्व

**प्रत सविनय –**

मा.सचिव सहकार व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य मुंबई.

**प्रत माहितीस्तव -**

१) साखर आयुक्त , महाराष्ट्र राज्य पुणे
२) संचालक वस्त्रोद्योग व यंत्रमाग, नागपूर
३) पणन संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे.

**प्रतिलिपी:-**

विशेष कार्य अधिकारी , (पदुम मंडळ ) मुंबई.

**सहकार आयुक्त व निबंधक**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**